महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात
६६ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई

नोटीस क्र :— १२९९/एनु/२०२१ गुन्हा नोंद क्र :— १११४/२०२१
पोलीस ठाणे साकीनाका

आसिफ ताहेर शेख ... अर्जदार.

विरूध्द्

महाराष्ट्र सरकार, ... गैरअर्जदार.
द्वारा — वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
(साकीनाका पोलीस ठाणे)

निशाणी क्र.—१ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज साकीनाका पोलीस ठाणे गुन्हा क्र.१११४/२०२१ कलम ३७९ भादवि संहिता मध्ये जप्त ऑटो रिक्षा नोंदणी क्र.एम.एच.—०३—बी.वाय.—८४२६ चा अंतरिम ताबा मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदाराकडे जप्त वाहनाचे आर.सी. बुक असून ते त्याच्या नावावर आहे. अशी कथने करून अर्ज मंजूर होण्याची विनंती अर्जदाराने केलेली आहे. शासकीय अभियोक्ता यांचे म्हणणे वाचले. अर्ज मंजूर होण्यास त्यांनी आक्षेप घेतला नाही. अर्जदाराचे वकील आणि शासकीय अभियोक्ता यांचे युक्तिवाद ऐकले.

२. अर्जाच्या पृष्ठर्थ अर्जदाराने स्वत:चे शपथेवर प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र.२) दाखल केलेले आहे. जप्त वाहनाच्या आर.सी.बुकची पडताळणी केलेली प्रत (निशाणी क्र.४) दाखल केलेले आहेत. जप्त वाहनाच्या आर.सी.बुकची पडताळणी प्रतीवरून अर्जदार जप्त वाहनाचे कायदेशीर मालक दिसत आहे. आजपर्यंत इतर कोणीही जप्त मुद्दे्मालाबाबत कोणत्याही प्रकारे दावा केलेला नाही. त्यामुळे अर्ज अटी व शर्तीवर मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ संबंधित तपासी अंमलदार यांना आदेशीत करण्यांत येते की, साकीनाका पोलीस ठाणे गुन्हा क्र.१११४/२०२१ कलम ३७९ भादवि संहिता मध्ये जप्त ऑटो रिक्षा नोंदणी क्र.एम.एच.—०३—बी.वाय.—८४२६ चा अंतरिम ताबा अर्जदारास त्याने रू. १,००,०००/. (रू. एक लाख फक्त) चा शतीपूर्ती बंधपत्र दिल्यावर खालील अटींवर त्यास देण्यात यावा.

३ अर्जदाराने जप्त मुदद्देमाल न्यायालयाच्या पूर्व परवानंगी शिवाय हस्तांतरित करू नये अथवा त्यामध्ये बदल करू नये.

४ तपासी अंमलदार यांनी जप्त मुदद्देमालांचे छायाचित्रे सर्व बाजूंनी भविष्यातील त्याच्या ओळखीसाठी काढावेत व त्याबाबतचा दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा तयार करावा.

५ छायाचित्रे, पंचनामा व शतीपूर्ती बंधपत्र अन्वेषन अधिका—याने दोषारोपपत्रासोबत अथवा अंतिम अहवालासोबत दाखल करावेत.

Sd/-

दि.१८/०१/२०२२.

(विजय चिं. गवई)
महानगर दंडाधिकारी,
६६वे न्यायालय, अंधेरी, मुंबई.